जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ८६७ दिनांक – १३/०५/२०२०**

**विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे**
**मध्य प्रदेश राज्यातील नागरीकांना एसटी बसची सोय करुन मूळ गावी पाठविणेची केलेले चांगले कामगिरीबाबत.**

महाराष्ट्र राज्यात व पुणे शहरात करोना व्हायरस या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने व शासनाने आंतर राज्य लॉक डाऊन केलेने विश्रांतवाडी पोलीस स्टेशन हददीत मध्येप्रदेश येथील राहणारे परप्रांतिय नागरीकांना त्यांचे मुळगावी पाठविणेसाठी आदेश झालेने सदर नागरीक दररोज गावी जाणेसाठी पोलीस स्टेशन येथे जाणेसाठी मागणी करत असलेने आम्हास मा. श्री .सुनिल फुलारी ,अप्पर पोलीस आयुक्त सो पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. श्री. पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त सो,परि. ४ पुणे शहर यांनी त्यांचे वैयक्तीक प्रयत्नातून एस टी कंट्रोलर यांचेशी संपर्क करुन एकूण ४ एस टी बसेस उपलब्ध करुन दिल्या .आम्ही पोलीस स्टेशन हददीत राहणारे मध्यप्रदेश राज्यातील अडकलेले एकुण ८८ महीला व पुरुष नागरीकांना बोलावून त्यांची डॉ. वाडकर यांचे कडून वैदयकीय तपासणी करुन त्यांना एस टी बस मध्ये सोशल डिस्टंन्सने प्रत्येक सीटीवर १ याप्रमाणे एका बस मध्ये २२ असे ४ बस मध्ये ८८ नागरीकांना बसवून आज दिनांक १२/०५/२०२० रोजी सकाळी ११/०० वा त्यांचे मूळगावी जाणेसाठी मा. श्री. सुनिल फुलारी ,अप्पर पोलीस आयुक्त सो पुर्व प्रादेशिक विभाग पुणे यांनी हिरवा झेंडा दाखवून व मा. पोलीस उप आयुक्त सो,परि. ४ पुणे शहर यांचे मार्गदर्शन व आदेशाप्रमाणे विनाशुल्क त्यांना शिर्डी ,मालेगाव ,धुळे ,यावल, मार्गे खांडवा येथील बार्डर पर्यंत पाठविणेत आले आहे. मध्येप्रदेश येथे जाणारे सर्व नागरीकांनी पोलीसांनी केलेले चांगले सहकार्या बददल पोलीसाचे अभिनंदन करुन भारत माता की जय,घोषणा देत महाराष्ट्र पोलीसांबददल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

सदरची चांगली कामगिरी **मा. श्री. सुनिल फुलारी ,अप्पर पोलीस आयुक्त सो पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. पोलीस उप आयुक्त सो,परि. ४ पुणे शहर यांचे मार्गदर्शना खाली आम्ही स्वतः श्री. अरुण आव्हाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पोनि गुन्हे श्री .रविंद्र कदम, सपोफौ दत्तू हेमाडे, पोहवा दिनकर लोखंडे, पोना विनायक रामाणे, पोना नितीन मुरकुटे, पोशि सोमनाथ खळसोडे, पोशि अनिकेत भिंगारे, पोशि रिहाण पठाण, पोशि संतोष रेंगडे, मपोना मानसी मोरे, मपोना अर्चना कारंडे, मपोना अश्विनी खरबस, मपोना सुरेखा हीले तसेच विशेष पोलीस अधिकारी प्रविण येरुणकर,कुणाल जाधव,किरण गोगावले, संजीव आगरवाल,लकी प्यासी,पोलीस मित्र राजेश गोयल** यांनी विषेश सहकार्य केलेले आहे.


MH-14
BT-3399


पोलीस स्टेशन
पोलीस स्टेशन




पोलीस स्टेशन
पुणे शहर
SANITIZATION
TUNNEL